महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मुंविमं/मा.प./७७७
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.
दिनांकः-०१/०६/२०२३

प्रति,

१. मा.महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२.
२. मा.विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, मुंबई विभाग.
३. मा.संचालक, दुरदर्शन केंद्र, मुंबई-४०० ०३२.
४. मा.संचालक, आकाशवाणी केंद्र, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, मुंबई-४०० ०२०.
५. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, मुंबई व उपनगरे ठाणे,रायगड, पालघर जिल्हा.
६. मा.संपादक, सर्व वृत्तपत्रे.

**विषयः** मार्च-२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल व विविध तपशील जाहीर करणेबाबत...

महोदय,

मार्च-२०२३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र ,वृत्तवाहीन्या ,आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

1-6-23

(डॉ.ज्योति परिहार)
विभागीय सह सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई, ४०० ७०३.


Telephone : 27652445,27662504,27881077,27881075,27899987 * Fax : 27659491/27881349
Email : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

**विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२३ चा निकाल**

---

मंडळामार्फत मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर शुक्रवार, **दिनांक ०२/०६/२०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे.**

**अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.**

१. www.mahresult.nic.in
२. http://sscresult.mkcl.org
३. https://ssc.mahresults.org.in
४ https://hindi.news18.com/news/career/board-results-maharashtra-board
५ https://www.indiatoday.in/education-today/maharashtra-board-class-10th-result-2023
६ http://mh10.abpmajha.com

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च २०२३ परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आऊट) घेता येईल.

**www.mahresult.nic.in** या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबरच वेगवेगळी सांख्यिकी माहिती उपलब्ध होईल.

तसेच www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर शाळांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे-

१) ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (http://verification.mh-ssc.ac.in) स्वत: किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. **गुणपडताळणीसाठी शनिवार, दिनांक ०३/०६/२०२३ ते सोमवार, दिनांक १२/०६/२०२३** पर्यंत व **छायाप्रतीसाठी शनिवार, दिनांक ०३/०६/२०२३ ते गुरूवार, दिनांक २२/०६/२०२३** पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन

२) मार्च २०२३ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) मार्च २०२३ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोनच संधी **(जुलै-ऑगस्ट २०२३ व मार्च २०२४)** **श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme)** योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) जुलै-ऑगस्ट २.०२३ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी व श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी **बुधवार दिनांक ०७/०६/२०२३** पासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

५) मार्च २०२३ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत **बुधवार दि.१४/०६/२०२३** रोजी दुपारी ३.०० वाजता वितरित करण्यात येतील.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक:- ०१/०६/२०२३